नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २६/०८/२०२६ (बुधवार )

.................................................................................................

## २ तासात दरोडयाचा गुन्हा उघड,४ आरोपी निष्पन्न बुटीबोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुटीबोरी यांच्या नेतृत्वात बुटीबोरी पोलीसांनी **अवघ्या २ तासात** दरोडयाचा गुन्हा उघड करून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**दिनांक २६/०८/२०२६ रोजी रात्री फिर्यादी ओम राजूर बिसेन, वय २१ वर्षे, रा. शिरूड, ता. हिंगणा, जि. नागपूर हा अपना पंजाबी ढाबा, रुईखैरी येथे जेवण करून मोटारसायकलने बुटीबोरी ते सातगाव मार्गे घरी जात असताना, अंदाजे पाहटे ०४:०० वाजताच्या सुमारास सातगाव रोडवरील आई लॉनसमोरील रस्त्यावर अंधाराचा फायदा घेत काही इसमांनी त्यांची मोटारसायकल अडविली. आरोपींनी फिर्यादीस चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांच्याकडील रोख रक्कम ४५००/—रूपये , जुना वापरता आयफोन अंदाजे किंमती २०,०००/—रूपये, ऑनलाईन रक्कम किंमती २०००/—रूपये तसेच हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एम एच ३१ बी एल ९१७० किंमती २५,०००/—रूपये असा एकूण ५१,५००/—रूपयांचा मुद्देमाल बळजबरीने हिसकावून घेतला. तसेच फिर्यादीस हातबुक्क्यांनी व लोखंडी रॉडने मारहाण करून आरोपी घटनास्थळावरून पळुन गेले.**

सदर घटनेची गंभीर दखल मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात बुटीबोरी पोलिसांनी तात्काळ आरोपीचा शोध सुरू केला. तांत्रिक माहिती व गोपनिय माहीतीच्या आधारे आरोपींचा शोध घेतला असता १) दिक्षांत धनराज पाटील, वय २६ वर्षे, रा. वार्ड क्र. ६, व्हिडीओ चौक, बुटीबोरी,२) अमित अरुणराव भोयर, वय २७ वर्षे, रा. प्रभाग क्र. १०, जुनी वस्ती, बुटीबोरी, ३) देव मुक्तारसिंग भट्टी, वय २७ वर्षे, रा. के.ई.सी. कॉलनी, बुटीबोरी, आणि ४) आशिष संतोष कराडे, वय २६ वर्षे, रा. फेन्ड्र कॉलनी, बुटीबोरी यांनी सदर गुन्हा केल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपींना ताब्यात घेत चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची माहीती दिली. चारही आरोपींना अटक करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

## बनावट नोटा तयार करून देतो असे सांगुन फसवणुक करणारे तसेच वन्यजीव अवयव व अंमली पदार्थ बाळगणारे आरोपी अटकेत, ७ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांच्या नेतृत्वात उमरेड पोलीसांनी बनावट नोटा तयार करून देतो असे सांगुन फसवणुक करणारे तसेच वन्यजीव अवयव आणि अंमली पदार्थ बाळगणाऱ्या आरोपींवर कारवाई केली आहे. सदर प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी ७,९०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक २६/०८/२०२६ रोजी उमरेड शहरातील घटाळी रोड परिसरात काही इसम बनावट नोटा बाळगून त्यांची विक्री करणार असल्याची गोपनिय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी त्यांचा शोध घेण्याासाठी सतर्क पेट्रोलींग केली असता एक संशईत कार घटाळी रोडकडुन उमरेडकडे येत असताना दिसुन आली. मारूती स्विफ्ट क्रमांक एच आर ०६ ए व्ही ६५४९ हे वाहन मिळुन आले. सदर वाहनाची पंचासमक्ष

तपासणी केली. वाहनामध्ये कुलदीप कश्यप, मोहित नरेश कश्यप व गौरव राधेश्याम कश्यप आणि १ महिला आढळून आली.वाहनाच्या झडतीमध्ये मध्ये १०० रूपये दराच्या नोटांचे ६ बंडल (एकूण ६००००/— रूपये) तसेच १० रूपये दराच्या ९९ नोटा (९९० /—) रूपये आढळून आल्या. याशिवाय कागद, काच, मशीन/लॉकर, केमीकल बाटल्या व इतर साहित्य मिळुन आले. तसेच वाहनाच्या तपासणीदरम्यान एका पिशवीत काळविटाच्या शिंगासारखे एक शिंग, हरणाच्या शिंगासारखे एक शिंग तसेच वाघाचे दात असे वन्यजीवांच्या अवयवांसदृश वस्तु मिळुन आल्या.तसेच वहानात एका धातूच्या डबीत काळ्या—चॉकलेटी रंगाचा ४.३४ ग्रॅम वजनाचा तसेच २१,७००/— किंमतीचा अफू सदृश अंमली पदार्थ आढळून आला.

चौकशी दरम्यान असे माहीती प्राप्त झाली की, वर नमुद आरोपी नागरिकांना कमी रक्कम दिल्यास त्याच्या बदल्यात जास्त रकमेच्या बनावट नोटा देतो असे सांगत होते. तसेच ते त्यांच्या जवळील कागद, काच, मशीन/लॉकर, केमीकल बाटल्या व इतर साहित्य दाखवुन विश्वास संपादन करत होते. नागरिकांकडून पैसे घेतल्यानंतर प्रत्यक्षात बनावट नोटा न देता संबंधितांची फसवणूक करून आरोपी पैसे घेऊन फरार होत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.या फसवणुकीत उमरेड येथील अक्षय वसंतराव पाटील याचा सहभाग असल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे.पोलीसांनी वाहन, रोख रक्कम आणि अंमली पदार्थ असा एकुण ७,९०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी १) कुलदीप धनुराम कश्यप, वय ३६ वर्षे,रा. घर नं. ५, गल्ली नं. ५, भासेला कॉलनी, अरुणपुरी रोड, घरौंडा, करनाल, हरियाणा.२)मोहित नरेश कश्यप, वय २६ वर्षे,रा. डोबर कॉलनी, रामलीला ग्राउंड, पानिपत, हरियाणा., ३)गौरव राधेश्याम कश्यप, वय २५ वर्षे,रा. डोबर कॉलनी, रामलीला ग्राउंड, पानिपत, हरियाणा,४) महीला आरोपी तसेच तपासात निष्पन्न झालेला ५) अक्षय वसंतराव पाटील, रा उमरेड यांच्याविरुद्ध कलम ३१८(४), ३(५) भान्यासं,सह कलम वन्यजीव संरक्षण अधिनियम,सह कलम एनडीपीएस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## घरफोडीचा गुन्हा उघड, २ आरोपी अटक,
## ५ लाख २१ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने दिनांक २५/०८/२०२६ रोजी मौदा पोलीस स्टेशन येथे दाखल १ घरफोडीचा गुन्हा उघड करून ५,२१,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणी २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

दिनांक २५/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात उघड न झालेल्या गुन्हयांचा तपास करीत असतांना पोलीस स्टेशन मौदा अप. क्र. ५५७/२०२६ कलम ३३१(४), ३०५(अं) भा.न्या.सं सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे घरफोडी गुन्हे करणारे २ सराईत गुन्हेगार **आरोपी नामे १) विश्वेश धनराज मोहाडीकर, वय २३ वर्षे, रा. विनोबा भावे नगर नागपुर २) राहुल राजू हटेवार, वय २४ वर्ष, रा. कुंदनलाल गुप्ता नगर, पंजाबी लाईन यशोधरा नागपूर यांना पोस्टे यशोधरा नागपूर शहर परिसरातून ताब्यात घेतले.** नमुद आरोपीकडे कौशल्यापुर्ण विचारपुस केली असता त्यांनी दिनांक १८/८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन मौदा परिसरात घरफोडी केल्याचे कबुल केले आहे.

**पोलीसांनी पंचासमक्ष सोन्याचा ऐवज आणि रोख रक्कम असा एकुण ५,२१,७००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.**

## अवैधरित्या गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, १ आरोपी अटक ,मोहपा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मोहपा :—** दिनांक २४/०८/२०२६ रोजी मोहपा पोलीसांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली की, मौजा खैरी देशमुख शेत शिवार मनिष धोटे यांच्या शेतात अंमली पदार्थ गांजाचे झाड लावले आहे. मोहपा पोलीसांनी सदर माहीती मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री. सागर खर्डे, उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांना देत त्यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन कारवाई करत आरोपी मनिष धोटे यांचा शेतात पंचासमक्ष पाहणी केली असता गांजाची झाडांची लागवड केलेली दिसुन आले. आरोपी **१) कृष्णा बंळवंतराव भिंगारे, रा. सुसुन्द्री, ता. कळमेंश्वर, जि. नागपुर आणि २) मनिष रघुनाथ धोटे, नागपुर यांनी सदर लागवड केल्याची माहीती प्राप्त झाली.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून अंमली पदार्थ गांजा सदृश्य वनस्पती १ नग हिरव्या रंगाचे पाने असलेली वजन ३.३९८ किलोग्रॅम किमती ८४,९५०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद प्रकरणी आरोपी १) कृष्णा बंळवंतराव भिंगारे, वय ५६ वर्षे,रा. सुसुन्द्री, ता. कळमेंश्वर, जि. नागपुर २) मनिष रघुनाथ धोटे, वय ६० वर्षे, रा. नागपुर यांच्याविरूद्ध पोलीस स्टेशन मोहपा येथे एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २५/०८/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बाजारसमिती उमरेड पुलीयाचे खाली नाकाबंदी केली असता एक्टीवा क्र. एम. एच—३१/सि एफ— ५००१ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे सकिल सुलतान शेख, वय ४८ वर्ष, रा. जोगीठाणापेठ उमरेड, ता. उमरेड, जि. नागपुर हा** अवैधरीत्या दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) ७२ देशी दारूच्या निपा किंमती ५७६०/—रूपये २)** एक्टीवा क्र. एम. एच—३१/सि एफ— ५००१ किंमती २००००/—रूपये **असा एकुण किंमती २५,७६०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड:—** दिनांक २५/०८/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असता तसेच पोलीस ठाणे, हददीतील हिस्ट्रीशिटर, सराईत गुन्हेगार, तडिपार चेक करणे करिता हद्दपार गुन्हेगार चेकींग करीत असता मौजा मोहदी दळवी हेटी येथे **आरोपी नामे चंद्रशेखर रामचंद्र खोब्रागडे, वय ३२ वर्ष, रा. हेटी, मोहदी दळवी ता. नरखेड जि. नागपूर** यास चेक केले असता हा त्याचे राहते घरी मिळून आला. नमुद आरोपी हा पोस्टे नरखेड मधून नागपूर जिल्ह्यातून हद्दपार असून एक महिन्या करिता हद्दपार असल्याचे निष्पन्न झाले. असे असूनही सदर हद्दपार इसम याने शासनाची कोणत्याही प्रकारची पूर्व परवानगी न घेता नमूद ठिकाणी विना परवानगी पोस्टे नरखेड हद्दीत त्याचे राहते घरी मिळून आला. त्याने हद्दपार आदेशाचे उल्लंघन केले आहे.त्यामुळे त्याचे विरुद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०६ गुन्हे नोंद. एकुण ५३,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २५/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ५३,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) लिलाधर उकंडराव सोनबरसे, वय ४९ वर्ष, २) सूनिल सूखदेव धवराळ, वय ४४ वर्ष, दोन्ही रा. नारसिंगी, ता. नरखेड, जि. नागपूर हे अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे यमराज सुखदेव डोंगरे, वय ५२ वर्ष, रा. पचखेडी, ता. कुही हा अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे ०१) अजितखां अमिरखां पठाण, वय ६४ वर्ष, रा. वार्ड नं. ०३, रा. लोणारा, ता. कळमेश्वर, जि. नागपुर २) प्रभाकर काषीराव बोबड़े, वय ३६ वर्ष, रा. सावता मंदीर रोड, वार्ड ०१, ता. कळमेश्वर, जि. नागपुर हे अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे सुरज भरत पवार, वय ३० वर्ष, रा. ह. मु. हनुमान मंदीर जवळ महालक्ष्मी नगर, सावनेर २) विशाल चंद्रशेखर बंभोर, वय २५ वर्ष, रा. वार्ड क्र १७, पहिलेपार सावनेर ३) नामदेव गणपती बहेतवार, वार्ड क्र. १७, पहलेपार सावनेर ४) कैलास वर्मा, रा. वार्ड क्र. १७, पहिलेपार सावनेर हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे प्रज्वल प्रकाश शेंडे, वय २६ वर्ष, रा. टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर २) निरज भोयर, रा. टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर ३) उमेश धनराज केवट, वय ३७ वर्ष, रा. टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपूर ४) चेतन भगत, रा. टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपूर हे अवैधरीत्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना /खेळताना मिळुन आले.

# नागपूर ग्रामीण पोलिसांनी राबवली अवैध दारूविरोधात विशेष मोहीम दारूबंदी कायद्यान्वये २४ गुन्हे दाखल

**दिनांक २५/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध विशेष जनजागृती व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २४ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन मौदा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान येथे ०२** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे ०१** गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** ०२ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी येथे** २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन अरोली येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा येथे** १ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन** खापा **येथे** १ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर येथे** २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बेला येथे** ०४ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बोरी येथे** ०५ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३४३८० मिली देशी दारू, १५१२० मिली विदेशी दारू, २९ लिटर मोहाफुल दारू, वाहन असा एकुण ५८,६४६/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने